
# भारतीय सण–उत्सव

भाग १

डॉ. भाग्यश्री कुलकर्णी



परी प्रकाशन

भारतीय सण-उत्सव
भाग १

© सुरक्षित

प्रकाशक :
परी प्रकाशन
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

प्रमुख वितरक
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

मुखपृष्ठ :
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

मुद्रक :
जयंत प्रिंटरी

आवृत्ती :
२९ ऑगस्ट, २०१३

किंमत :
रुपये १४०/-

## अनुक्रमणिका

१. गुढीपाडवा ........ ३
२. वटपौर्णिमा ........ २१
३. आषाढी एकादशी ........ ४१
४. नागपंचमी ........ ६१
५. रक्षाबंधन ........ ८१
६. गोकुळाष्टमी ........ १००
७. बेंदूर – पोळा ........ ११९
८. हरितालिका ........ १३७
९. गणेश चतुर्थी ........ १५६
१०. गौरी उत्सव – ज्येष्ठा गौरी ........ १७४



# गुढीपाडवा

''चित्रा, झाली की नाही तुझी रांगोळी काढून ?'' आतून आवाज आला.

''होतीय. ताईला बोलव जरा. ताई... ए ताई... इकडे ये.'' चित्रा बाहेरून हाका मारू लागली.

''काय गं चित्रे ऽ मला आत काम आहे. कशाला हाका मारतेस?'' ताईनं विचारलं.

''ताई, बघ नं इथं काहीतरी चुकलंय. जमतच नाही.''

''चित्रे, काय गं ठिपके काढलेस ? किती वाकडे-तिकडे आणि फरशी पाण्यानं स्वच्छ धुऊन घेतली नाहीस होय ?'' ताई चित्रानं काढलेल्या त्या सुबक ठिपक्यांकडे पाहात म्हणाली.

''पाणी नं, ओतलं की बादलीभर. तू मदत कर नं मला. मी हे ठिपके पुसून टाकते. तू छान ओळीत काढून दे.'' चित्रानं हातानं ठिपके पुसले आणि सगळी फरशी रांगोळीनं अस्वच्छ झाली.

''बाई... बाई... कशाला हातानं पुसलेस ? झाडू मारला असता ना. चित्रे, तू अंगण झाडलंसुद्धा नाहीस ? आईनं काय सांगितलं होतं- स्वच्छ अंगण झाडून फरशी स्वच्छ करा आणि मग ठिपक्यांची किंवा फुलांची रांगोळी घाल. किती घाण करून ठेवलीयस. थांब मीच लोटून घेते आणि फरशी धुऊन देते.'' ताई कामाला लागली. खांद्यावरची ओढणी तिने आईच्या पदरासारखी कमरेला खोचली आणि हातात झाडू घेऊन ती अंगण झाडू लागली. तेवढ्यात बाबा हातात वेळू घेऊन बाहेर आले.

चित्रा त्यांच्याकडे आली. तिनं बाबांना विचारलं, ''बाबा, बांबूचं काय करताय ?''

''चित्रा, याला वेळू किंवा वेळूची उंच काठी म्हणायचं.''

''पण तुम्ही काय करताय ?''

''मी ना ही वेळूची काठी स्वच्छ करतो. पाण्यानं धुऊन घेतो. मग त्याला हळदीकुंकू, गंध लावून गेजवस्त्र घालायचं.''

''चित्रे, ठिपके काढून झाले बघ. आता काढ रांगोळी.'' ताईनं ओरडून सांगितलं.

''चित्रा, इथेही छानशी, छोटी रांगोळी काढ हं.'' हाताने एक फरशी दाखवत बाबांनी सांगितलं.

''बाबा, अंगणात एवढी मोठी रांगोळी घालणार आहे आणि मग इथं कशाला ?''

''चित्रा, आपण गुढी इथं उभी करणार आहोत किनई मग जिथे गुढी उभी करायची तिथेही रांगोळी काढायची बरं.''

''बरं बाबा, तिथं मी फुलं-पानं काढते.'' चित्रा ताईकडे जाता जाता म्हणाली.

''चित्रे, आता व्यवस्थित रांगोळी काढ. वेंधळेपणा करू नकोस आणि रंगही छान भर.''

''ताई, रंगीत रांगोळी तर केव्हाच संपली. दिवाळीत आणली होती ना ?'' चित्रानं ताईलाच विचारलं.

''बरं संपली तर संपू दे. रांगोळी काढल्यावर त्यावर हळदीकुंकू टाक. विसरू नकोस.''

''हळदीकुंकू कशाला ? पांढरी स्वच्छ छान दिसेल की. मला पांढरीच आवडते.'' चित्रा म्हणाली.

''चित्रे, शहाणपणा करू नकोस. आईनं सांगितलंय ना पांढरी रांगोळी अशुभ असते म्हणून. निमूटपणे हळदीकुंकवाची बोटं उठव.'' ताई म्हणाली.

''ताई, तू थांब ना इथंच.''

''नाही गं बाई. मला आईला मदत करायची आहे. अजून माझी आंघोळ व्हायचीय. आता कुठं बाबा जाणार आहेत.''

''ताई, आज जेवायला काय आहे गं ?''

''झाली का आठवण खाण्याची ? अजून झोपेतून उठून तासही झाला नाही.''

''लागलीस का बोलायला ! आजी काय म्हणते पाठीवर मारावं; पण पोटावर मारू नये... आणि...''

''अगं, मलाही माहीत नाही, पण बासुंदीचा बेत असेल. बाई... बाई तुझ्याबरोबर मी काय बोलत बसले. मला किती कामं आहेत.'' ताई पळतच घरात गेली.

चित्रानं सुबक रांगोळी काढली. त्यावर हळदीकुंकू टाकलं आणि वर रांगोळीनंच एक वाक्य लिहिलं. 'चित्राच्या रांगोळीवर पाय ठेऊ नये.' बाबांनी दाखवलेल्या फरशीवर रांगोळी घातली. तुळशी वृंदावनासमोर चित्रांगण काढलं. आपणच काढलेल्या रांगोळीकडे तिने एकदा डोळे भरून पाहिलं आणि ती घरात गेली.

''बाबा, माझं खणाचं परकर पोलकं पाहिलंत का ? कसं दिसतंय मला ?'' नवीन परकराचा घोळ आवरत चित्रानं बाबांच्याजवळ येत विचारलं.

“झकास ! कुणी गं आणलं ?”

“आजीनं शिवून पाठवलंय; पण बाबा, मी शाळेत घालून जाणारच नाही. का माहितेय ?”

“का बुवा ? एवढं छान तर दिसतंय.” बाबा गुढीच्या पूजेची तयारी करीत होते. ती करता करता ते चित्राशी बोलत होते.

“बाबा, हे आताच्या फॅशनचं नाही. मला नाही आवडलं; पण आई माझ्यावर ओरडली म्हणून मी घातलं. ताईला आवडलंय.”

“बाळा, असं म्हणू नये. आजीनं एवढ्या प्रेमानं पाठवलंय. तू शहाणी आहेस ना !”

“हो. बाबा, हे तुम्ही काय करताय ?”

“मी होय ! मघाशी तो वेळू धुतला होता ना. आता त्या वेळूची मी पूजा करणार आहे. हे गंध लावणार. हळदीकुंकू, अष्टगंध लावणार, गेजवस्त्र, फुले घालणार. मग या वेळूच्या किंवा गुढीच्या टोकाला ही नवीन साडी घेतली आहे ना ती बांधणार. त्यावर पांढऱ्या चाफ्याची माळ, साखरेची माळ, कडुनिंबाची डहाळी बांधायची आणि त्यावर हा तांब्याचा तांब्या पालथा घालून सगळं एकत्रित बांधलं की झाली आमची गुढी तयार उभारायला.”

“बाबा, मी साखरेची माळ खाऊ ?” चित्रानं साखरेच्या माळेला हात लावत विचारलं.

“संध्याकाळी खा हं ताईबरोबर. आता ती देवाला अर्पण केलीय ना. आता दोन मिनिटं बोलू नकोस हं. मी धूप-दीप दाखवतो.” बाबांनी गुढीची आरती करून पंचारती ओवाळली.

“बाबा, झाली पूजा ?”



‘‘हो, जा आईकडनं नेवैद्य आण बघू. पळ.’’

‘‘बाबा, ही घ्या साखर. बाबा गुढी कशाला हो उभारायची ?’’

‘‘चित्रा, गुढी ही आनंद, उत्साह आणि वीर वृत्ती यांचे प्रतीक मानली जाते. अनेक गोष्टींची आठवण म्हणून आपण गुढी उभारतो.’’

‘‘मला सांगा ना. सांगा नं बाबा.’’ चित्रा हटवादीपणानं म्हणाली.

‘‘आता नाही हं. जेवल्यावर सांगतो. ताईलाही ऐकायला पाहिजे. जा आईला बोलव. म्हणावं मी गुढी उभारतोय.’’

‘‘आई, आई बाबा बोलवतायत.’’

‘‘आले, आले. चला, चला. सावकाश हं लाईटच्या वायरीला लागेल गुढी.’’ आई म्हणाली.

‘‘आई, अजून कुणाचीच गुढी उभारलेली नाही. पहिला नंबर आपलाच.’’ चित्रा म्हणाली.

‘‘चित्रा, अगं सूर्योदयापूर्वीच गुढी उभी करायची असते.’’ आईनं उत्तर दिलं.

‘‘पण आई, सूर्य कुठे मावळतो ? आमच्या भूगोलच्या सरांनी शिकवलंय आम्हाला.’’ ताईनं विचारलं.

‘‘हे बघ, पूर्वापार चालत आलेले हे कुलाचार असतात आणि ते आपण असेच चालवावेत, या मताची मी आहे.’’ आई म्हणाली.

‘‘अगं, बोलत काय बसलीस ? बघ गुढी व्यवस्थित उभी राहिली आहे ना ?’’

‘‘हो. अगदी व्यवस्थित आहे. मी धरते खालून, तुम्ही टेरेसवर जाऊन ग्रीलला रेशमी दोरीने बांधून या.’’ आईनं सांगितलं.

‘‘आई, रेशमी दोरी तू तयार केलीस ना ? मला माहीत आहे.’’ ताई म्हणाली.

‘‘अगं, आपण गुढी म्हणजे मांगल्याचं प्रतीक मानतो त्यामुळे देवाची पूजा जशी करतो तशीच त्याच पावित्र्यात गुढी उभी करायची असते.’’ आई म्हणाली.

‘‘चला. गुढी तर उभारली. आता कडुनिंब खाऊया. चला आत या गं मुलींनो.’’ बाबा म्हणाले.

‘‘ईऽऽ मी नाही हं खाणार. कडू कडू लागतो.’’ चित्रा म्हणाली.

‘‘नाही गं चित्रे, थोडा खा; पण कडुनिंब खाल्लाच पाहिजे. आयुर्वेदामध्ये कडुनिंबाचं महत्त्व सांगितलंय. तुला माहीत आहे, कडुनिंब हा अमृतापासून निर्माण झालेला आहे असं मानतात. कारण कडुनिंबाच्या झाडाच्या प्रत्येक भागाचा उपयोग होतो. कडुनिंबाची पाने, फुले, फळे एवढंच नाही त्याच्या फांद्या, साल आणि काड्यांचाही उपयोग होतो.’’ बाबा समजावून सांगत होते.

‘‘नाही, मी नाही खाणार.’’ चित्रा म्हणाली.

‘‘बघा बुवा. ताई तर खाणार आहे, कारण कडुनिंबाचा पाला हा आयुष्य वाढविणारा, आरोग्य टिकवणारा आहे. शिवाय बुद्धी तल्लख करणारा आहे. ताई शाळेत पहिला नंबर मिळवणार. तुम्ही मिळवा ढोक नंबर.’’ बाबा म्हणाले.

‘‘चित्रे, बाबा सांगतात तर खावं गं राणी. ताई तू सांग बरं.’’ आई म्हणाली.

‘‘चित्रे, आई खूप छान बनवते. जरासुद्धा कडू लागत नाही. त्यात नुसता काही पालाच नसतो तर त्यात... आई काय काय असतं गं ?’’ ताईनं विचारलं.

‘‘त्यात नं कडुनिंबाची कोवळी पानं, भिजवलेली हरभऱ्याची डाळ, मिरी, ओवा, मीठ, हिंग, साखर, चिंच घालून बारीक वाटून घेतली. त्यात कडूपणाचा अंश आहे. चांगलं लागतं. खाऊन तरी बघ.’’ आई म्हणाली.

‘‘ठीक आहे. एवढंसं खाते. दे मला.’’ चित्राने थोडंसं खाऊन पाहिलं आणि म्हणाली, ‘‘एवढं काही कडू लागत नाही; पण मला नको.’’

‘‘बरं राहिलं. ताई, आता पंचांगाची पूजा करायची हं.’’

‘‘हो बाबा. मग माझं भविष्य वाचायचं.’’ ताई म्हणाली.

‘‘हो, पण फक्त तुझंच नव्हे देशाचंही भविष्य असतं त्यात. पीक-पाणी, हवामान साऱ्या गोष्टी कळतात. चला पूजा करूया.’’ बाबा म्हणाले.

‘‘बरं का, एवढं वर्षफल वाचून झालं की, मी स्वयंपाकाला लागते.’’ आई म्हणाली.

‘‘आई, मी पण तुला मदत करणार.’’ ताई म्हणाली.

‘‘नको हं. कृपा कर माझ्यावर. तुझं काम म्हणजे मला दुप्पट डोक्याला ताप. बाई... बाई एक काम सांगितलं की उपद्‌व्याप करणार. नको गं बाई. अहो, यांना इथंच तुम्ही कशात तरी गुंतवून ठेवा. या दोघी आत आल्या नाहीत तरच माझा स्वयंपाक लवकर होईल.’’

‘‘ताई, चित्रा आई काय म्हणते ? तुम्ही नका तिला त्रास देऊ. मी तुम्हाला गुढीपाडव्याची मजा सांगतो.’’

‘‘असं का हो बाबा. मला मदत करायची आहे.’’ ताई रूसक्या स्वरात म्हणाली.

‘‘नको म्हटलं ना. तेवढे उपकार करा माझ्यावर. तुम्ही वर्षफळ वाचा म्हणजे मी रिकामी होईन.’’ आई म्हणाली.

‘‘ठीक आहे.’’ बाबा पंचांगाची पूजा करू लागले.

✦

‘‘चित्रा, ताई, बसा इथं. तुमच्या आईचा स्वयंपाक होईपर्यंत तुम्हाला छानशी गोष्ट सांगतो.’’ बाबा म्हणाले.

‘‘बाबा, मला भूक...’’ चित्रा म्हणतच होती तेवढ्यात ताईनं वाक्य पूर्ण केलं,

''मला भूक लागली. बाबा, झालं बघा हिचं सुरू.''

''ताई, असं नाही म्हणायचं हं. अगं, लागते एखाद्याला सारखी भूक. पण चित्रा बेटा, आईचा तर अजून स्वयंपाक व्हायचा आहे. तुला थांबायला हवं.''

''पण बाबा, तिला नाश्ता करून द्यायला काय होतंय ? आंघोळ केल्यानंतर तिनं मला ब्रेड, बिस्किटंही खाऊ दिली नाहीत.'' चित्रा आईची तक्रार करीत म्हणाली.

''वा गं वा, आईनं बिस्किटं खाऊ नको म्हणाली ते सांगितलंस आणि आंघोळीच्या आधी उठल्या उठल्या आख्ख्या बिस्किटाचा पुडा फस्त केलास तो. ते नाही सांगितलंस.'' ताई म्हणाली.

''बिस्किटाचा पुडाच नाही काही. कोरड्या पोह्याला फोडणी दिली होती ना आईनं ते पण खाल्ले. तरी मला भूक लागली.''

''चित्रा, आता जर तू काही खाऊन पोट भरून घेतलंस तर मग तुझ्या गालासारख्या फुललेल्या पुऱ्या कोण खाणार ? आणि तुझ्या आवडीची बासुंदी ?'' बाबांनी विचारलं.

''मीच खाणार. मी थांबते ना आईचा स्वयंपाक होईपर्यंत.'' चित्रा म्हणाली.

''दॅटस् लाइक अ गुड बेबी.'' बाबा म्हणाले.

''बाबा, तुम्ही काहीतरी सांगणार होता ना ? मग सांगा नं.'' ताईनं आठवण करून दिली.

''हो सांगतो हं. पहिल्यांदा मी तुम्हाला आपल्या गुढीपाडवा या सणाची माहिती देतो.''

''मला माहीत आहे, मला माहीत आहे.'' ताई ओरडली.

''अरे व्वा ! तुला माहीत आहे ! मग सांग पाहू.'' बाबांनी ताईकडे कौतुकानं पाहात विचारलं.



''गुढीपाडव्याच्या दिवशी जी मुलं शाळेत पहिल्यांदा जातात त्यांच्याकडून पाटीपूजन, सरस्वतीपूजन करवून घेतात. कालच मी शेजारच्या पिंकीला वहीवर सरस्वती काढून दिली.'' ताईनं सांगितलं.

''बरोबर. ताई तुला माहीत आहे का आपलं वर्ष केव्हा सुरू होतं? सांग पाहू.''

''एक जानेवारीला.''

''नाही बरं. हिंदू धर्मियांचं नववर्ष चैत्र शुद्ध प्रतिपदेला सुरू होतं. चैत्र शुद्ध प्रतिपदा म्हणजेच वर्षप्रतिपदा यालाच आपण गुढीपाडवा म्हणून ओळखतो.''

''बाबा, चैत्र का म्हणायचं ? माझ्या नावासारखं चित्रा का नाही म्हणायचं ?'' चित्रानं विचारलं.

''चित्रा या नक्षत्रावरूनच चैत्र महिन्याला हे नाव पडलं. चित्राचं चैत्र. खरं म्हणजे 'चित्र' या संस्कृत शब्दावरून 'चैत्र' हा शब्द तयार झाला. चित्र म्हणजे विविधता किंवा वैविध्य.''

''बाबा, म्हणजे आपण चित्राला चैत्र म्हणायला सुरुवात करूया.'' ताई म्हणाली.

''चैत्र शुद्ध प्रतिपदेचा दिवस हा साडेतीन मुहूर्तांपैकी एक मुहूर्त मानला जातो. या चैत्र महिन्यात कडाक्याची थंडीही नसते आणि वैशाखातील वैशाखवणवाही नसतो. वसंत ऋतू असतो. त्यामुळे सगळीकडे उत्साह आणि आनंद पसरलेला असतो.'' बाबा म्हणाले.

''आणि बाबा, त्या शेवग्याच्या झाडाला आणि नवीन लावलेल्या झाडाला किती छान पानं आली आहेत. तुम्ही पाहिलीत? चला ना पाहायला जाऊ या. चला ना.'' चित्रा म्हणाली.

''अगं, मी केव्हाच पाहिली झाडांना पालवी फुटलेली. वसंत ऋतूत नवीन पालवी येते आणि तुला माहीत आहे, ताई जशी छान गाते तसाच कोकिळ पक्षी छान सुरेल आवाजात गात असतो. म्हणजे काय सगळीकडे छान छान वातावरण असतं.'' बाबा म्हणाले.

''पण बाबा हा सण का साजरा करायचा ? म्हणजे केला नाही तर काय होईल ?'' चित्रानं विचारलं.

''केला नाही तर काही होत नाही. तुझा वाढदिवसही केला नाही तर काय होईल ! चालेल ना?'' बाबांनी विचारलं.

''नाही. माझा वाढदिवस करायचाच. मला किती छान वाटतं. आपण हा साजरा करूया. मग करणार ना माझा वाढदिवस बाबा ?'' चित्रा बाबांच्या गळ्यात हात टाकीत म्हणाली.

''हो. करायचा ना. तू इथं बैस पाहू शहाण्यासारखी. मी सांगतोय ते ऐक.'' बाबांनी त्यांच्या गळ्यातले तिचे हात बाजूला केले आणि एका हाताला धरून तिला आपल्या बाजूला बसवून घेतलं.

''बाबा, गुढीपाडवा का साजरा करतात ते सांगा ना ?'' ताई म्हणाली.

''अनेक कारणांसाठी आपण गुढीपाडवा साजरा करतो. चैत्र शुद्ध प्रतिपदेला म्हणजे गुढीपाडव्याला ब्रह्मदेवाने सृष्टीची निर्मिती केली असं म्हटलं जातं. नारदमुनी ठाऊक आहेत ना तुला ? तर नारदमुनींचे साठ मुलगे म्हणजे साठ संवत्सरे असतात. त्यापैकी प्रत्येकाचा वर्षारंभ पाडव्यालाच साजरा केला जातो.''

''बाबा, कंटाळा आला. असलं नका नं सांगू. छानशी गोष्ट सांगा नं.'' ताई म्हणाली.

''गोष्ट ना. सांगतो की, पण ताई कंटाळा आला असं म्हणायचं नाही. आईनं सांगितलंय ना तुला आणि कुठल्या एकेक सवयी लावून घेतेस ? सारखं ते बाई बाई.. कुठलं म्हणत असतेस ?'' बाबांनी विचारलं.

''बाबा, ती रखमाबाई आहे नं आपल्याकडे. भांडी घासायला येते ती. ती सारखी म्हणत असते म्हणून ही पण म्हणते.'' चित्रानं बाबांना माहिती दिली.

''ताई, अशा सवयी लावून घेऊ नयेत.''

''बरं बाबा. तुम्ही गोष्ट सांगा नं.'' ताई म्हणाली.

''हो सांगतो की, पण कुठली सांगू ? बसू राजाची सांगू की शालीवाहन राजाची सांगू, की प्रभू रामचंद्राची सांगू ?'' बाबांनी विचारलं.

''अं... शालीवाहन राजाची सांगा.'' चित्रानं सांगितलं.

''ठीक आहे. ऐका हं.

✦

शालीवाहन नावाचा एक अत्यंत चांगला राजा होऊन गेला. पैठण ही त्याची राजधानी होती. त्याच्या राज्यातले सारे लोक सुखी होते. सगळीकडे आबादीआबाद असल्यामुळे लोकांना काही नवीन करायलाच संधी नव्हती. रोजची कामे करून उरलेला वेळ आळसात घालविणं हेच त्यांचं मुख्य काम होतं. बरीच वर्षे शालीवाहन राजाने कुठलंही राज्य मिळवण्याचा प्रयत्न केला नव्हता. त्याच्या सैन्याला काहीही काम नव्हतं. प्रत्येक सैनिक तर रोजची कवायत करायच्या ऐवजी सुस्तपणे पडून राहात होते. सगळीकडे एक उदास वातावरण पसरलेले होते. राजालाही काय करावं हे समजत नव्हतं. असेच काही दिवस निघून गेले.

एके दिवशी शालीवाहन राजाचा प्रधान घाईघाईनं दरबारात आला. राजाला अभिवादन करून त्यानं राजाला विचारलं,

'महाराज, एक बातमी आपल्याला सांगायची आहे. आपली आज्ञा असेल तर...'

'हो प्रधानजी काही विशेष आहे का ?'

'हो महाराज. आपल्या खास बातमीदाराने खबर आणली आहे.' प्रधानजी म्हणाले.

'कोणती खबर आहे ती ?'

'महाराज, आपल्या राज्यावर शत्रूचं आक्रमण होणार आहे.'

'कशावरून ?'

'महाराज, आपल्या गुप्त बातमीदाराकडून आणलेली खबरबात कधी खोटी नसते.'

'बरं पुढे ?'

'आपण या आक्रमणाचा सामना करण्यासाठी सज्ज राहायला हवं महाराज.'